# देवस्थान जमिनीच्या खरेदी विक्रीला तात्काळ बंदी घाला

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

मुंबई (सरकार): महाराष्ट्र शासनानं देवस्थान वतन जमिनींच्या खरेदी–विक्री व्यवहारांवरील नोंदणी प्रक्रिया तत्काळ थांबविण्याचे निर्देश दिले आहेत. पुणे येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या उपमहानिरीक्षक (मुख्यालय) कार्यालयातून जारी झालेल्या परिपत्रकानुसार, शासन धोरण ठरविण्यात येईपर्यंत कोणत्याही देवस्थान इनाम मिळकतींच्या दस्तऐवजांची नोंदणी करता येणार नाही.हा निर्णय १३ मे रोजी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली, कोल्हापूरचे पालकमंत्री यांच्या उपस्थितीत झालेल्या ऑनलाइन बैठकीत घेण्यात आला. या बैठकीत देवस्थान वतन जमिनींसंबंधी अनधिकृत व्यवहार रोखण्यासाठी धोरणात्मक चर्चा झाली आहे.



शासन धोरण येईपर्यंत देवस्थान जमिनींचे व्यवहार थांबवा असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी विभागास दिले आहेत. फक्त न्यायालयीन आदेश किंवा अधिकृत मंजुरी असलेल्या जमिनींचेच दस्त नोंदणीस मान्य देण्यात येणार आहे. १३ मे २०२५ रोजी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक झाली होती. त्यात देवस्थान मिळकतीबाबत निर्देश देण्यात आले. देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरवण्यात येत आहे. त्यामुळे या जमिनीविषयी सक्षम अधिकाऱ्याचे विक्री आदेश अथवा न्यायालयाकडून विक्री आदेश असतील तरच देवस्थान मिळकतीचे व्यवहार करता येतील. त्याऐवजी राज्यातील कोणत्याही देवस्थान मिळकतीचे खरेदी–विक्री व्यवहारांचे दस्त नोंदणीस स्वीकारू नये असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. असे दस्त स्वीकारल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित दुय्यम निबंधक यांची असेल असे बैठकीत स्पष्ट केले.

महसूल विभागाच्या या नवीन आदेशापूर्वी सुद्धा अनेकदा या खात्याने शेतकरी आणि इतरांना अशा जमिनी खरेदी करताना खबरदारीचा इशारा दिला होता. देवस्थान व राखीव वन नोंदी असलेल्या जमिनीची खरेदी डोकेदुखी ठरू शकते. कारण या जमिनीची मालकीचा प्रश्न अडचणीचा ठरतो. अशा जमिनीवर एकतर नावावर होत नाही. त्यामुळे आर्थिक तोटाही होतो. जमीन पण हातातून जाते आणि उल्लंघनाची कारवाई होते ती वेगळीच. काही एजंट विविध यंत्रणांना हाताशी धरून या जमिनी नावे लावून देतात. पण प्रकरण उघड झाले की नामनिराळे होतात. या व्यवहारात जमीन खरेदीदारांचे सर्वात जास्त नुकसान होते. त्यामुळे अशा जमिनी खरेदीचे व्यवहार टाळणे शहाणपणाचे ठरेल.




सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# सरकार

संपादक–आदोडे साहस

Evening Daily beedsarkar

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २३५ वा ■ बुधवार १४ मे २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १५ मे २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 235 ■ wednesday 14 May 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


### गतिमंद बीडमध्ये मुलीला जिवंतपणी मरणयातना

# जन्मदात्यानेच बांधले जनावरांच्या गोठ्यात

बीड (सरकार): मुळ गेवराई तालुक्यातील असलेल्या आईच्या मृत्यूनंतर पाच वर्षांची गतिमंद रिहाना वडिलांच्या अमानुष वागणुकीची शिकार झाली. बीड जिल्ह्यातील एका गावात तिच्या व्यसनी बापाने तिला जनावरांच्या गोठ्यात पायाला दोरी बांधून डांबले होते. तिला अक्षरश: केळी, टरबुजाच्या साली खाण्यास देऊन जिवंतपणी मृत्यूच्या वेदना दिल्या. मात्र, एका महिलेने तिचा आक्रोश ऐकून दत्तक घेण्याचा प्रयत्न केला. सहा महिन्यांनंतर, सोमवारी रिहानाचा दामिनी पथकाच्या मदतीने कायदेशीर पुनर्वसन होण्याचा मार्ग मोकळा झाला.

रिहानाच्या आईचे काही वर्षांपूर्वी निधन झाले. ती गेवराईची होती. व्यसनी वडिलांना रिहाना डोईजड झाली. रिहानाचा नैसर्गिक मृत्यू होण्याच्या उद्देशाने त्याने तिचे हालहाल केले. रिहानाला अक्षरशः जनावरांच्या गोठ्यात पायाला दोरी बांधून ठेवणे सुरू केले. सकस आहार, माणसांच्या सहवासाच्या अभावी रिहानाची बौद्धिक, शारीरिक वाढच झाली नाही. ती बोलू शकत नव्हती. दरम्यान, पैठणच्या हिना नामक महिलेला हे समजले. हिना माहेरी गेलेली असताना तिला सतत रडण्याचा आवाज येत होता. तिने गोठ्यात जाऊन पाहिल्यावर रिहाना दिसली. रिहानाची अवस्था पाहून तिला मायेचा पाझर फुटला. तिने तिच्या वडिलांकडे ताबा मागितला. निर्दयी बापाने बॉण्डवर लिहून देत रिहानाला हिनाकडे सुपुर्द केले.



हिनाच्या घरी आल्यानंतर माणसांमध्ये आलेल्या रिहानाच्या वागण्यात मोठा बदल घडला. अधिक हिंस्त्र झाली होती. इतरांना मारहाण करून, सतत आदळआपट करू लागली. त्यामुळे हिना यांनी हज हाऊसजवळील खालिद अहमद यांच्या अनाथ आश्रमात तिला नेऊन सोडले. खालिद यांनी तिच्यावर उपचार केले. मात्र, आश्रमात सर्व मुलेच असल्याने त्यांनी दामिनी पथकाच्या उपनिरीक्षक कांचन मिरधे यांना संपर्क केला. मिरधे यांच्यासह अंमलदार निर्मला निंभोरे, लता जाधव, सरिता कुंडारे, अंबिका दारुंटे, प्रियंका भिवसने, पूजा जाधव, मनीषा बनसोडे परळकर यांनी धाव घेत तिला ताब्यात घेतले. उपचार, समुपदेशनानंतर रिहानाच्या वागणुकीत बदल होत आहे. ती थोडं थोडं बोलण्याचा प्रयत्न करत असल्याचे पोलिसांनी सांगितले. महिला–बाल कल्याण समिती अध्यक्ष ड. आशा शेरखाने यांच्या सहकार्याने रिहानाची भारतीय सेवा केंद्र येथे राहण्याची व्यवस्था करून पुनर्वसन केले.

## श्री.महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारला

बीड (सरकार): बीड शहरापासून जवळच असलेल्या धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील रामनगर येथील महालक्ष्मी चौकात छत्रपती संभाजी महाराज यांचा शंभूप्रेमींनी रात्रीतून पुतळा उभारण्यात आला आहे. दरम्यान बीड ग्रामीण पोलिसांना पहाटे याची माहिती मिळ्यानंतर धाव घेत पुतळा उभारणाऱ्या काही शंभूप्रेमींना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. आज १४ मे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आहे. १४ मे १६५७ रोजी छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्म किल्ले पुरंदर येथे झाला. आज त्यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत असताना बीड येथील महालक्ष्मी चौकात शंभूप्रेमींनी रात्रीतून त्यांचा पुतळा उभारला आहे. पुतळा उभारणाऱ्या काही शंभूप्रेमी यांना ताब्यात घेतल्याची माहिती असून महालक्ष्मी चौकात मोठा पोलिस फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.



## उपजिल्हाधिकारी कार्यालयावर परळीत २० मे रोजी सीटू कामगार संघटनेचा मोर्चा

परळी (सरकार): महाराष्ट्र कामगार संयुक्त कृती समीतीच्या वतीने महाराष्ट्रव्यापी संप आहे. बीड जिल्हा सीटू कामगार संघटना संपात सहभागी होत आहे. त्या दिवसी परळी तालुक्यातील सीटूशी जोडलेल्या कामगार संघटना परळी उपजिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी १ वाजता भव्य मोर्चा काढणार आहेत.

राज्य सरकार व केंद्र सरकारचे कामगार विरोधी थोरणामुळे प्रचंड बेरोजगारी निर्माण झालेली आहे. आशा वर्कर व अंगणवाडी कर्मचारी यांना सरकारी कामगारांचा दर्जा मिळावा, खाजगीकरण थांबवावे, सरकारने कंत्राटीकरण थांबवावे, कामगारासाठीच्या चार कामगार संहीता मागे घ्याव्यात, कामगारांना किमान वेतन २६०००रु द्यावे: सर्व ६० वर्षावरील पेन्शन नसणाऱ्या सर्व नागरीकांना १०००० रु पेन्शन द्यावी.परळी तालुक्यातील आशाचे सर्व प्रकारचे थकीत मानधन द्यावे, घरेलू कामगार कल्याणकारी मंडळाने घरेलू कामगारांच्या पहिल्या दोन मुलांना शिष्यवृत्ती द्यावी, बांधकाम कामगारांचे सर्व प्रश्न तालुक्यातील डब्लूएफसी केंद्राने सोडवावेत. ग्रामीण भागातील बांधकाम कामगारांना नोंदणीसाठी ग्रामसेवकांनी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र द्यावे इत्यादी प्रमुख मागणीसाठी परळी तालुक्यातील बांधकाम कामगार, आशा, घरेलू कामगार असंघटित कामगार मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहे. कामगारांनी मोठ्या संस्थेने मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहान आशाच्या नेत्या हेमा काळे, आशा लांडगे, किरण सावजी, सिटूचे जिल्हा अध्यक्ष प्रा.बी.जी खाडे, शेख जावेद, कामगारनेते जालिंदर गिरी, घरकामगार रोहिणी लोणीकर यांनी केले आहे.

### नरेगाच्या बोगस आणि निकृष्ट कामांचा

## आ.क्षीरसागरांकडून ‘पोस्टमार्टम’

### भ्रष्टाचारात समावेश असलेल्या प्रत्येकावर कारवाईसाठी पाठपुरावा करणार– आ.संदीप क्षीरसागर



बीड (सरकार): बीड विधानसभा मतदारसंघात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणजेच नरेगाच्या अंतर्गत अनेक निकृष्ट दर्जाची आणि बोगस कामे झाली आहेत. शासकीय अधिकारी यांच्याशी संगनमत करून अनेकांनी यामध्ये मोठा भ्रष्टाचार केलेला आहे. या सर्व प्रकरणांचे आता आ.संदीप क्षीरसागर यांनी पोस्टमार्टम करायला सुरुवात केली आहे, म्हणजेच झालेल्या कामांची स्वतः आ.संदीप क्षीरसागर जाऊन पाहणी करत आहेत. नरेगा अंतर्गत झालेली कामे अत्यंत निकृष्ट आणि काही ठिकाणी तर चक्क बोगस असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

बीड विधानसभा मतदारसंघातील बीड आणि शिरूर कासार तालुक्यात अनेक ठिकाणी बोगस कामे झाल्याचा तक्रारी होत्या. अनेक कामे हि अतिशय निकृष्ट झालेली आहेत. काही विशिष्ट लोक, ठेकेदार आणि शासकीय अधिकारी यांनी संगनमत करून भ्रष्टाचारी पॅटर्न राबवला आहे. या गंभीर विषयाची दखल घेत आ.संदीप क्षीरसागर यांनी झालेल्या बोगस आणि निकृष्ट कामांची पाहणी आणि चौकशी सुरु केली आहे. बुधवारी (दि.१४) रोजी बीड तालुक्यातील नाळवंडी आणि काळेगाव हवेली या गावांमध्ये आ.संदीप क्षीरसागर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत जाऊन झालेल्या निकृष्ट आणि बोगस कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. आता बीड मतदार संघात झालेल्या नरेगाच्या प्रत्येक बोगस आणि निकृष्ट कामाची मी स्वतः जाऊन प्रत्यक्ष पाहणी करणार आहे. शासनाच्या निधीची पद्धतशीर विल्हेवाट लावण्याचे काम करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.



## भारतीय सैनिकांचा अवमान करणाऱ्या भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला मारले जोडे



### भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा–काँग्रेस

परळी (सरकार): ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकांना गोळीबार करत मारले.त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून. दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले.

अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम, शौर्याचे संपूर्ण देश कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत बेताल, बेजबाबदार, संतापजनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्याचं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला काँग्रेस सह समविचारी पक्षाच्या वतीने माजलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी जोडे मारून मंत्री विजय शहाला तात्काळ मंत्री मंडळातून हाकलून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा असे काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील काम्रेड बाबा मुस्दीक शेख रशीद राजेश घोडे नामदेव सोजे हरिभाऊ सोळंके धम्मानंद साळवे दत्ता कांबळे फारूक शेख मनोज परके शरद यादव यांच्या सह कार्यकर्त्यांनी केली.

### शरद पवार गटात मोठ्या फेरबदलाच्या हालचाली

## ५ पदाधिकाऱ्यांची उचलबांगडी

मुंबई (सरकार): गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन्ही गट एकत्र येण्याची चर्चा जोरदार चर्चा सुरु आहे. शरद पवार यांच्या एका वक्तव्यामुळे ही सगळी चर्चा सुरु झाली होती. मात्र, अजित पवार यांनी मंगळवारी झालेल्या आमदारांसोबतच्या बैठकीत शरद पवार गट आणि आपल्यात एकत्र येण्याची कोणतीही चर्चा सुरु नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे शरद पवार गट आणि अजितदादा गट एकत्र येणार का, याचे उत्तर आणखी लांबणीवर पडले आहे. परंतु, नेमक्या याचवेळी शरद पवार गटात फेरबदलाच्या हालचाली सुरु झाल्या आहेत.



कोणत्या पदाधिकाऱ्यांची पदं काढली जाऊ शकतात?

मेहबूब शेख–युवक प्रदेशाध्यक्ष,सुनील गव्हाणे–विद्यार्थी अध्यक्ष.विद्यार्थिनी प्रदेशाध्यक्ष– पद खाली,सर्व प्रवक्ते – पद खाली ५) अल्पसंख्याक अध्यक्ष– पद खाली

## अनोळखी इसमाचे प्रेत आढळले ओळख पटविण्याचे आवाहन



परळी (सरकार): सदर अनोळखी मयत वय ८० वर्षीय अंदाजे हा दिनांक १४ ५ वीस पंचवीस रोजी तेरा वाजता मयत अवस्थेत बस स्टँड परळी मिळून आले तरी मयताचे ओळख पटल्यास संभाजीनगर पोलीस स्टेशन परळी येथे संपर्क साधावा०२४४६(२९९११४)

बीड
# सरकार
बुधवार दिनांक १४ मे २०२५


## संपादकीय

# शस्त्रसंधी कुणासाठी...

भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू करताच अवघ्या चार दिवसांत भारत-पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधी जाहीर झाली. पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर आणि पाकिस्तानच्या हवाई तळांवर भारताकडून हवाई हल्ले होत असताना अचानक शस्त्रसंधीची घोषणा झाल्याने देशातील जनतेला मोठा आश्चर्याचा धक्काच बसला. भारताने शस्त्रसंधी स्वीकारली असली तरी ती मनापासून नाही हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणावरून स्पष्ट दिसून आले. यापुढे बंदुकीच्या गोळीचे उत्तर तोफेच्या गोळ्याने देण्यात येईल असा खणखणीत इशाराच त्यांनी पाकिस्तानला दिला आहे. न्युक्लिअर ब्लॅकमेलिंगला आम्ही किंमत देत नाही असेही त्यांनी पाकला ठणकावले आहे. पाकिस्तानशी चर्चा झालीच, तर ती केवळ दहशतवाद आणि पाकव्याप्त काश्मीर या मुद्द्यावरच असेल. दहशतवाद आणि संवाद एकाच वेळी होऊ शकत नाहीत, दहशतवाद आणि व्यापार हे एकत्र चालू शकत नाहीत. पाणी आणि रक्त एकाच वेळी वाहू शकत नाही. अशा भाषेत पंतप्रधान मोदींनी पाकिस्तानला खडे बोल सुनावले आहेत. ऑपरेशन सिंदूर थांबल्याची घोषणा झाल्यावर पंतप्रधान मोदींनी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात आक्रमकता होती, आवेश होता, दहशतवादाचा बदला घेणारच अशी जबरदस्त उर्मी होती.

दहशतवादी कारवायातून भारतात रक्तपात घडविणाऱ्या पाकिस्तानवर विश्वास कसा ठेवायचा हाच कळीचा मुद्दा आहे. देशाची फाळणी झाल्यापासून पाकिस्तानमध्ये कधीच शांतता नांदलेली नाही. पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद गेली सहा दशके देशात हिंसाचाराचे थैमान घालतो आहे. भारत- पाकिस्तान या दोन्ही देशांनी शस्त्रसंधी स्वीकारल्यानंतर दोन्ही देशांच्या सरहद्दीवर चालू असलेले गोळीबाराचे व बॉम्बगोळ्यांचे आवाज काहीसे शांत झाले. एकमेकांवर होणारा ड्रोनचा मारा थंडावला. पहलगाम हत्याकांडानंतर दोन्ही देशांत कमालीचा तणाव वाढला होता. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला जबर हादरा दिला होता. भारतीय सेना पाकिस्तानला कायमचा धडा शिकविण्यासाठी सक्रिय असताना अचानक जाहीर झालेल्या शस्त्रसंधीमुळे कोट्यवधी भारतवासीयांना आश्चर्याचा धक्काच बसला. हिंसाचार, दहशतवाद आणि मानवी रक्ताची चटक लागलेल्या पाकिस्तानवर विश्वास कसा ठेवायचा? याच प्रश्नाने काहूर निर्माण केले आहे.

देशाची फाळणी झाल्यापासून भारताने पाकिस्तानबरोबर अनेकदा समझौते आणि संघर्ष विराम करण्यासाठी प्रयत्न केले. शस्त्रसंधीच्या प्रस्तावाला मान्यता दिली. पण घुसखोरी आणि पाकिस्तानप्रेरीत दहशतवाद कधीच थांबला नाही. भारताने पाकिस्तानला आजवर अनेकदा माफ केले आहे. पहलगाम हत्याकांडात २६ भारतीय महिलांना विधवा केल्यानंतरही अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका ट्वीटवर ऑपरेशन सिंदूर ठप्प होते, हे आश्चर्यकारक आहे.

भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीनंतर अनेक प्रश्नांची उत्तरे मिळालेली नाहीत. भारतीय सेना पाकिस्तानी दहशतवादाचा बिमोड करीत असताना, ड्रोन व क्षेपणास्त्रांसह शत्रू राष्ट्रावर विलक्षण वेगाने झेपावत असताना अचानक लाल झेंडा कशासाठी दाखवला गेला? ऑपरेशन सिंदूर सुरू झाल्यावर पाकिस्तानमध्ये रोज मोठी पडझड होत होती. भारताच्या लष्करी सुसज्ज सामर्थ्यापुढे आणि भक्कम अर्थव्यवस्थेपुढे पाकिस्तानचा किती निभाव लागू शकणार? ऑपरेशन सिंदूरने चार दिवसांत पाकिस्तानचे महाप्रचंड नुकसान केले. पाकिस्तानचे असंख्य सैनिक ठार झाले. पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रावर मोठे हल्ले झाले. पाकची अनेक ठिकाणी रडार सिस्टीम उद्ध्वस्त झाली. अनेक ठिकाणी संरक्षण प्रणाली कोलमडून पडली. भारताने नऊ दहशतवादी तळ हवाई हल्ले करून उद्ध्वस्त केले, त्यात १००पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाले. दहशतवादाचा निषेध म्हणून भारताने सुरुवातीला राजनैतिक विरोध केला. नंतर व्यापार-आयात-निर्यात बंद करून पाकवर आर्थिक निर्बंध लादले. सतलज नदीचे पाणी बंद केले. पाकिस्तानी नागरीकांना देशातून बाहेर काढले.


सैन्य दलाची तैनाती केली. नंतर सर्जिकल स्ट्राइक व एअर स्ट्राइक केले. मग जमिनीवरून तसेच नौदल व हवाई दलाचे हल्ले केले. ब्रम्होसच्या प्रखर हल्ल्यानंतर पाकिस्तानचे धाबे दणाणले. ब्रम्होस क्षेपणास्त्राची रेंज २९० किमी. आहे आणि २५०० किमी वेगाने हल्ला करू शकते. पाकिस्तानने जम्मू-काश्मीर, पंजाब, राजस्थान, गुजरातमधील भारतीय लष्करी तळांवर क्षेपणस्त्रांनी हल्ले चढवले पण प्रत्येक क्षेपणस्त्राला भारताने अडवले व ते निष्क्रीय केले. दोन्ही देशांत अण्वस्त्र क्षमता आहे. आण्विक हल्ले झाले, तर मोठा नरसंहार होईल असे वातावरण निर्माण झाले. म्हणूनच तातडीने शस्त्रसंधी व्हावी यासाठी पाकिस्तानने अमेरिकेकडे मदतीकरता धाव घेतली. ऑपरेशन सिंदूरने स्पष्ट संदेश दिला आहे की, भारत आपल्या आकाशाचे संरक्षण करण्यासाठी केवळ सक्षम नाही, तर तो त्याच्यावर नियंत्रण ठेवतो...

भारत-पाकिस्तान शस्त्रसंधी झाली याचे श्रेय अमेरिकेने घाईघाईने जाहीरपणे घेतले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्वीट करून आणि वॉशिंग्टन डीसी येथे पत्रकार परिषद घेऊन भारत-पाकिस्तान दरम्यान आम्ही युद्ध थांबवले असे जगाला सांगितले. दोन देशांत अण्वत्र युद्ध झाले असते, तर लाखोंचा नरसंहार झाला असता, तो आम्ही थोपवला असा त्यांनी दावा केला. युद्ध थांबवले नाही तर आम्ही व्यापार करणार नाही, असा इशारा आपण दोन्ही देशांना दिल्याचेही डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ही शस्त्रसंधी कायमस्वरूपी राहील असे सांगून यापुढे अमेरिकेचे बारीक लक्ष भारत-पाकिस्तानवर राहील असे त्यांनी सुचित केले आहे. अमेरिकेने आपला अजेंडा भारत व पाकिस्तान दोन्ही देशांच्या गळी उतरवला आहे, असाच संदेश जगभर गेला आहे. पंतप्रधान मोदींनी दि. १२ मे रोजी देशाला उद्देशून केलेल्या भाषणात अमेरिका किंवा डोनाल्ड ट्रम्प हे शब्दही उच्चारले नाहीत. शस्त्रसंधी जारी व्हावी यासाठी अमेरिकेने मध्यस्थी केली असे त्यांनी चुकूनही म्हटले नाही. किंबहुना त्यांनी आपल्या भाषणात अमेरिकेची दखल सुद्धा घेतली नाही.शस्त्रसंधी का झाली याचे कारण सांगताना ट्रम्प आणि मोदी यांची भूमिका पूर्ण वेगळी दिसली. पाकिस्तानचे डायरेक्टर जनरल मिलिटरी ऑपरेशन यांनी भारतीय सेनेशी संपर्क साधला. त्यांनी भारताला शस्त्रसंधी करण्याची विनंती केली. यापुढे पाकिस्तान दहशतवादी कारवाया किंवा लष्करी धाडस करणार नाहीत असे त्यांनी आश्वासन दिले म्हणून भारताने शस्त्रसंधी मान्य केली. पाकिस्तानी लष्कराच्या एका अधिकाऱ्याने केलेल्या फोनवर विश्वास ठेऊन शस्त्रसंधी कशी स्वीकारली जाऊ शकते? एवढा मोठा निर्णय घ्यायचा, तर दोन्ही देशांच्या पंतप्रधानांमध्ये व संरक्षणमंत्र्यांमध्ये तसेच लष्कर प्रमुखांमध्ये समोर अजेंडा ठेऊन चर्चा व्हायला पाहिजे होती. अमेरिकेने मध्यस्थी केली नाही किंवा ट्रम्प यांचे म्हणणे चुकीचे आहे असेही भारताने म्हटलेले नाही. दुसरीकडे ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याबद्दल पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरिफ यानी त्यांचे आभार मानले आहेत.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच मध्यस्थीसाठी पुढाकार घेतल्यामुळे भारताला शस्त्रसंधी स्वीकारणे भाग पडले काय हे भारताने अद्याप स्पष्ट केले नाही. मात्र शस्त्रसंधी झाल्यावर पाकिस्तानमधे जल्लोष सुरू झाला. भारताने शस्त्रसंधी स्वीकारल्याचे जाहीर करण्यापूर्वीच अमेरिकेच्या अध्यक्षांनी ट्वीट करून दोन्ही देशांनी शस्त्रसंधी करण्याचे मान्य केले आहे हे जगाला सांगितले. तसेच मोदींच्या भाषणाच्या तासभर अगोदर ट्रम्प यांनी पत्रकार परिषद घेऊन शस्त्रंसधी न केल्यास आपण व्यापार बंद करू असा दोन्ही देशांना इशाराही दिला. काश्मीर प्रश्नात मध्यस्थी करण्याची आपली तयारी असल्याचेही त्यांनी जाहीर केले. भारत-पाकिस्तान युद्धात अमेरिकेने मध्यस्थी करावी असे भारताने कधीच म्हटले नव्हते. काश्मीर प्रश्नात मध्यस्थ कोणी असणार नाही हीच भारताची भूमिका आहे. मग डोनाल्ड ट्रम्प हे जागतिक पंचांच्या भूमिकेत का पुढे येत आहेत? शस्त्रसंधी व्हावी यासाठी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी व्हान्स तसे परराष्ट्रमंत्री मार्को रूबीओ यांनी रात्रभर भारत-पाकिस्तानच्या पराराष्ट्रमंत्री व परराष्ट्र सचिवांशी चर्चा केली. ऑपरेशन सिंदूर मोहीम तेजीत असताना पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय नाणे निधीकडून एक अब्ज डॉलर्सचे कर्ज मंजूर होते हे सुद्धा आश्चर्यकारक आहे. पाकिस्तान टेरर फॅक्टरी आहे, याचे पुरावे भारताने वेळोवेळी जगापुढे मांडले आहेत. मग पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन भारताने शस्त्रसंधी स्वीकारावी हे सुद्धा अनाकलनीय वाटते.ऑपरेशन सिंदूर नंतर अवघ्या चार दिवसांत भारत- पाकिस्तान शस्त्रसंधी झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी कायमची शस्त्रसंधी असे म्हटले असले तरी नरेंद्र मोदींनी ऑपरेशन सिंदूरला तूर्तास स्थगिती असे म्हटले आहे. पाकिस्तानात मुसंडी मारताना व पाकिस्तानमधील दहशतवादी नेटवर्क उद्ध्वस्त करीत असताना भारताच्या कारवाईला एकदम ब्रेक लागला आहे. ऑपरेशन सिंदूरने पाकिस्तानला जबरदस्त धडा शिकवला का? पहलगाम किंवा पुलवामाचे दहशतवादी मिळाले का? बदला घेतला याचे समाधान प्राप्त झाले का? पाकिस्तानात घुसून मारू, चुन चुन के मारेंगे हे साध्य झाले का? पाकिस्तानवर विश्वास ठेवून भारताने ऑपरेशन सिंदूर तूर्त स्थगित केले, पण ही शस्त्रसंधी कुणासाठी?

# ‘श्याम’ची चटका लावणारी एक्झिट

‘श्यामची आई’ या प्रथम राष्ट्रपतीपदक विजेत्या मराठी चित्रपटात श्यामची अजरामर भूमिका साकारणारे माधव वझे यांनी इहलोकीची यात्रा संपवली. दर्जेदार अभिनेता, कसबी नाट्यदिग्दर्शक आणि निष्पक्ष नाट्यसमीक्षक म्हणून प्रसिद्ध असलेल्या वझेंनी प्रायोगिक रंगभूमीला मोठे योगदान दिले. चित्रपटांमध्ये अभिनय करताना त्यांनी रंगभूमी हेच आपले पहिले प्रेम असल्याचे दाखवून दिले. या मनस्वी कलाकाराला मानाचा मुजरा. एखाद्या कलाकाराचा जन्म एखादी खास भूमिका साकारण्यासाठीच व्हावा, अशी नियतीची योजना असू शकते. त्या कलाकाराने एकदा ही भूमिका साकारल्यानंतर पुन्हा त्या भूमिकेत दुसऱ्या कोणत्याही कलाकाराचा विचारही केला जाऊ शकत नाही. अशा काही अगदीच मोजक्या कलाकारांमध्ये माधव वझे यांचं नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. विष्णूपंत पागनीस यांनीही संत तुकारामांची भूमिका अशीच अजरामर करून ठेवली आहे. पण बालवयात ‘श्यामची आई’मधला श्याम इतक्या समरसतेने रंगवण्याची ही चित्रसृष्टीच्या इतिहासातील अनोखी घटना म्हणावी लागेल.



माधव वझे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाल्यानंतर त्यांचा उत्साही, हसरा आणि निरागस चेहरा डोळ्यांसमोर तरळून गेला. या वयातही पूर्ण कार्यक्षमतेने काम करणारे आणि जिन्याच्या पायऱ्या भरभर उतरून आपली दुचाकी घेऊन सगळीकडे फिरणारे माधव वझे आजही डोळ्यांसमोर दिसतात. ‘श्यामची आई’ नंतर फारसे चित्रपट न केल्याचे कारण विचारल्यावर ते नेहमी म्हणत, ‘श्यामची आई’ आणि ‘वहिनीच्या बांगड्या’ केल्यानंतर वडिलांनी स्पष्ट सांगितलं की आता प्रथम शिक्षण पूर्ण करायचं, पोटापाण्याची व्यवस्था करायची आणि नंतरच चित्रपट आणि नाटकांचा विचार करायचा. अर्थात त्या काळाचा विचार केला तर त्यांचे म्हणणे बरोबरच होते. पण विशेष माधव वझे यांचे वाटते की त्यांनी वडिलांचा सल्ला तंतोतंत पाळला.

माधव वझे यांनी पुण्याच्या वाडिया कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून काम केले. तिथेही ते विद्यार्थीप्रिय प्राध्यापक ठरले. प्राध्यापक म्हणून काम करत असताना त्यांची कलेची सेवाही सुरू होती. त्यांनी अनेक प्रायोगिक नाटके दिग्दर्शित केली आणि त्यात अभिनयही केला. त्याचवेळी ते जाणकार नाट्यसमीक्षक म्हणूनही नावारूपाला आले. खरे तर आज अवघे कलाविश्व त्यांना साक्षेपी नाट्यसमीक्षक म्हणून अधिक ओळखते. निवृत्तीनंतर मात्र त्यांनी कलेला पूर्णपणे वाहून घेतले. परशुराम देशपांडे यांनी मराठीत रूपांतरित केलेल्या शेक्सपियरच्या ‘हॅम्लेट’ या नाटकाचे दिग्दर्शन त्यांनी केले होते. २०१३ मध्ये रंगमंचावर आलेल्या या नाटकात कनक दात्ये आणि नेहा महाजन यांनी प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. वझे यांनी राज्य नाट्य स्पर्धेमध्ये उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदके मिळवली. त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य प्रथितयश नाटककारांच्या नाटकांच्या प्रयोगाचे दिग्दर्शन केले. गोवा येथील कला अकादमीच्या नाट्य विभागामध्ये अभ्यागत प्राध्यापक म्हणून काम करणारे वझे आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाचे सभासद होते. नाट्य संघाच्या देश-परदेशातील अधिवेशनामध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले. आंतरराष्ट्रीय नाट्य समीक्षक संघाच्या माध्यमातून त्यांनी अनेक देशांना भेटी दिल्या. त्या दौऱ्यांमध्ये त्या-त्या ठिकाणच्या रंगभूमीचा अभ्यास करण्याचे मोठे काम त्यांनी केले.

**प्रासंगिक**
**महेश धर्माधिकारी**

देशातील विविध ठिकाणच्या रंगकर्मींना आपल्या या अनुभवाचा फायदा व्हावा असे त्यांना मनापासून वाटे आणि या नवरंगकर्मींना मार्गदर्शन करण्यास ते सदैव तयार असत.‘श्यामची आई’ शिवाय त्यांनी २००९ मध्ये आलेल्या ‘३ इडियट्स’, २०१६ मध्ये आलेल्या ‘डिअर जिंदगी’, २०१९ मध्ये आलेल्या ‘छप्पर फाड के’ अशा काही हदी चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. ‘थ्री इडियट्स’मधील आत्महत्या केलेल्या तरूण मुलाच्या वडिलांची भूमिका अगदी काही सेकंदांचीच होती; पण तगड्या अभिनेत्यांच्या गर्दीतही मुलाच्या अंत्यविधीच्या वेळी शोकातिरेकाने रडणारे वडील विशेष लक्षात राहतात, यातच त्यांच्यातील अभिनेत्याचे यश आहे. या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान माधव वझे आणि आमीर खान यांच्यात रंगभूमी आणि मेथड अभिनयावर सखोल चर्चा झाली. वझे यांची भेट होण्यापूर्वी आमीर खानने त्यांच्याबद्दलची सर्व माहिती मिळवली होती. त्यावेळी वझे यांनी आमीरला मेथड क्टिंगचे ट्रेनिंग दिले, असेही म्हटले जाते. १९५३ मध्ये ‘श्याम’ साकारल्यानंतर त्याच वर्षी त्यांचा ‘वहिनीच्या बांगड्या’ हा दुसरा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटालाही रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला. त्यात माधव वझे यांनी छोट्या दिराच्या भूमिकेचे अक्षरश: सोने केले.

अभिनय, दिग्दर्शन आणि नाट्यसमीक्षा याबरोबरच त्यांचे विविध वृत्तपत्र आणि नियतकालिकांमध्ये लिखाण नियमित सुरू होते. पूर्वीच्या लेखकांप्रमाणे तेही कागदावर पेनने लेख लिहीत. पण काळ बदलला त्याप्रमाणे वृत्तपत्रे आणि नियतकालिकांच्या मागणीतही बदल झाला. प्रत्येकाला आता संगणकावर टाईप केलेले लेख हवे होते. वझे यांनी या वयात संगणकावर लेख टाईप करणे आणि नंतर ते संबंधितांना इमेल करणे हे सगळे शिकून घेतले. विशेष म्हणजे याबद्दल त्यांनी कधीही तक्रार केली नाही. एखादी नवी गोष्ट शिकताना त्यांच्या चेहऱ्यावर एखाद्या लहान मुलाप्रमाणे कुतूहलमिश्रित जिज्ञासा दिसायची. उतरत्या वयात या गोष्टी शिकणे बरेच कठीण असू शकते, हे बऱ्याच ज्येष्ठ नागरिकांना माहीत आहे; परंतु वझे यांनी हे आव्हान कपाळावर एकही आटी येऊ न देता लीलया पेलले. एखाद्या मोठ्या कलाकाराने आत्मचरित्र लिहावे, त्याची जोरदार प्रसिद्धी करावी आणि स्वत:च त्याचे गोडवे गात फिरावे ही सर्वसाधारण प्रथा. पण माधव वझे यांनी लिहिलेले ‘श्यामची आई, आचार्य अत्रे आणि मी’ हे आत्मचरित्र याला अपवाद ठरते. एक तर यात कुठेही असामान्य कार्य केल्याचा आव नाही. न समजणाऱ्या, जड शब्दांचा भडीमार नाही. सहजसोपी शैली आणि वाचकाशी संवाद साधत त्यांना गुंतवून ठेवणारे हे पुस्तक एका बैठकीत वाचून काढावे असे आहे.

यातही गंमत अशी आहे की, १९५३ मध्ये प्रदर्शित झालेल्या चित्रपटाबद्दल त्यांना आत्ता का लिहावेसे वाटले असेल असा प्रश्न पडतो. या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी त्यांनीच या प्रश्नाचे उत्तर दिले होते. ते म्हणाले, आपल्याला आत्मचरित्र किंवा काही आठवणी लिहायच्या असतील, तर त्या प्रामाणिकपणे लिहिता यायला हव्यात. ‘श्यामची आई’शी संबंधित काही व्यक्ती हयात असताना आपल्याला वाटते ते जसेच्या तसे लिहिणे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी हे पुस्तक इतक्या उशिरा लिहिण्याचा निर्णय घेतला आणि अगदी प्रामाणिकपणे लिहिले, हे वाचताना नक्की जाणवते. या पुस्तकात त्यांनी ‘श्यामची आई’च्या चित्रीकरणाच्या वेळच्या अनेक आठवणींना उजाळा दिला आहे. पुण्यातील टिपिकल वाड्यात वाढलेल्या लहानग्या माधवची राहण्याची व्यवस्था मुंबईत अत्र्यांच्या घरी करण्यात आली होती. अत्र्यांच्या घरातले वातावरण मात्र अगदी पाश्चात्य पद्धतीचे होते. त्यामुळे माधवची तिथे काहीशी घुसमट होऊ लागली. त्याच्या अभिनयात अत्र्यांनी पूर्वी पाहिलेली सहजता दिसेना. पर्यायाने कलाकार बदलण्याचा निर्णय घेण्यापर्यंत वेळ आली. शेवटी अत्र्यांच्याच टीममधल्या कोणी तरी त्याला स्वत:च्या घरी एका चाळीसारख्या ठिकाणी राहायला नेले. तिथे गेल्यावर माधवला घरातल्यासारखे वाटले, त्याच्या अभिनयात सहजता आली आणि पुढे इतिहासच घडला.

वनमालाबाईंबद्दलच्या अनेक आठवणीही त्यांनी या पुस्तकात शब्दबद्ध केल्या आहेत.

‘भरजरी गं पितांबर दिला फाडून’ हे गीत स्वत: प्र. के. अत्रे यांनी लिहिले आहे. हे गीत लिहीत असतानाचा प्रसंग वझे यांनी फारच छान वर्णन केला आहे. कर्जाचे थकलेले हप्ते वसूल करण्यासाठी वसूली अधिकारी आला तेव्हा ते हे गीत लिहीत होते... त्यावेळी माधव वझेही तिथे हजर होते. अत्र्यांनी त्या अधिकाऱ्याला थोडे पैसे काढून दिले आणि पुन्हा गीतलेखनात मग्न झाले. अशा परिस्थितीत इतक्या अवीट गोडीचे गीत त्यांच्या लेखणीतून उतरले, यातच त्यांची प्रतिभा दिसते. आता ‘श्यामची आई’मधील सर्व कलाकार इहलोक सोडून गेले आहेत. मध्यंतरी वनमालाबाई गेल्या तेव्हा या टीममधले आपणच मागे उरलो असल्याचे ते म्हणाले होते. आता आईचा लाडका श्यामही त्याच्या आईकडे गेला. ही टीम परलोकी पुन्हा एकत्र आली तर ‘श्यामची आई’सारखीच दर्जेदार कलाकृती तिथेही तयार होईल हे नक्की.

# मुलांना सूर्य नमस्कार शिकवा प्रतिकारक शक्ती वाढेल

कोरोना विषाणूची दुसरी लाट अत्यंत धोकादायक आहे. हे टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. आतापर्यंत, आजारपण टाळण्यासाठी तरूण, प्रौढ आणि वृद्ध पुरुषांना सतर्क केले जात होते. परंतु येत्या तिसर्या लाटेतही मुलांवर परिणाम होण्याची शक्यता वर्तली जात आहे.

या विषाणूपासून बचाव करण्यासाठी रोगप्रतिकार शक्ती मजबूत करणे महत्वाचे आहे. तरी आता तीच गोष्ट मुलांवर देखील लागू आहे. यासाठी त्यांना घरात असताना सूर्यनमस्कार करायला शिकवा. चला सूर्य नमस्कार करण्याचे फायदे जाणून घेऊया.

सूर्य नमस्कार नेहमी सूर्याच्या दिशेने करावे.या मुळे

सूर्यापासून ऊर्जा देखील मिळते आणि रोग प्रतिकारशक्ती पातळी वाढवते. सुरुवातीला, मुलांनी त्यांच्या क्षमतेनुसार हे केले पाहिजे. नंतर हळू हळू वाढवा. त्याचबरोबर सूर्यनमस्काराचा वेग देखील वाढवा.

✻ दररोज सूर्याकडे तोंड करून सूर्य नमस्कार केल्याने शरीरात

व्हिटॅमिन डी मिळत. या मुळे हाड देखील मजबूत होतात.

✻ हे दररोज केल्याने आळस आणि निद्रानाश सारख्या समस्या दूर होतात.

✻ सूर्य नमस्कार केल्याने संपूर्ण शरीराचा व्यायाम एकाच वेळी होतो. या मुळे शरीरात ताजेपणा अनुभवतो.

✻हा योग तरुण वयात केल्याने शरीरात लवचिकता कायम राहते.

✻ बरीच मुलं लहानपणापासूनच खूप लठ्ठ असतात, कालांतराने त्यांचा स्थूलपणा वाढतच जातो. सूर्य नमस्काराच्या साहाय्याने कमी वयात देखील वजन कमी केले जाऊ शकते.

✻ सूर्य नमस्कार फुफ्फुस आणि बरगड्यांच्या स्नायूंना बळकट करते.

✻ सूर्य नमस्कार १२ आसनांनी बनलेले आहे. म्हणून हे सर्व वयोगटातील लोक करू शकतात.

✻ सूर्यनमस्कार केल्याने संपूर्ण शरीरात रक्ताचा प्रवाह सुरळीतपणे वाहतो.

✻ सूर्य नमस्कार केल्याने त्वचेशी संबंधित आजारांपासून देखील मुक्तता मिळते.

✻ लक्षात ठेवण्याच्या गोष्टी –

सुरवातीला, मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार सूर्यनमस्कार करवावे.

– कृपया योग तज्ज्ञांशी चर्चा करा.

– एखादा गंभीर आजार असल्यास सूर्य नमस्कार करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेऊन सूर्य नमस्कार करा.

– सुरवातीला सूर्यनमस्काराची प्रत्येक क्रिया काळजीपूर्वक आणि आरामात करा.

# जुन्या कपड्यांचा नव्याने वापर

‘जुने ते सोने’ अशी म्हण आहे. या म्हणीप्रमाणे घरातील जुन्या कपड्यांचा नव्याने चांगला वापर होऊ शकतो. त्यासाठी थोडी मेहनत घेण्याची आवश्यकता आहे. जमेची बाजू म्हणजे हा ‘उद्योग’ तुम्हाला घरच्या घरी करता येऊ शकतो.

सोपा आणि उत्तम उपाय म्हणजे जुन्या उशीच्या खोळीत तशीच कापडे कापून टाकून एका बाजूने आणि मध्ये शिवून घेणे. मोठ्या सुईने हाताने देखील ते शिवता येते. मशीनच पाहिजे, असे नाही. जुन्या चादरी, पडदे, ओढण्यांमध्ये धान्याची जुनी छोटी पोती टाकून शिवून घेता येते. मोठ्या सुयांनी हवे तसे पायपुसणे, फडके चटकन शिवून देणा-या बायका अजूनही काही शहरांत घरोघरी फिरत असतात. चिंध्या करून त्यांचे



गालिचे, पायपुसणे देखील त्या लगेच किंवा दोन दिवसांत तयार करून देतात.

होलसेलने टॉवेल्स, नॅपकिन्स विकणा-या दुकानांत मॉल्सइतकीच किंवा त्याहून जास्त व्हरायटी पुसायच्या फडक्यांची मिळू शकते. जुने ब्लाऊज पिसेस, कॉटन वेस्ट, चांगली पण उसवलेली, जराशी रंग पडलेली पण रिजेक्ट झालेली कापडे नग, डझन किंवा किलोने अतिशय स्वस्त दरात मिळतात. तुमच्याकडच्या कोणत्याही सुती कापडाला चारी बाजूने एखादी पट्टी शिवून चांगले फडके कुठे कुठे शिवून मिळते. तिथे एखादी टीप कमी जास्त झाली, आडवी तिरपी झाली, तर चालते. त्यामुळे, जुने कापड फाडणे आणि शिवणे हे एक उत्तम स्ट्रेस बस्टर म्हणून देखील बघता येते.

घरात, घराबाहेर अनेक जागा अशा असतात की, त्या सातत्याने धुळीने माखून घेतात स्वत:ला. तिथे जुने-फाटकेपण धुतलेले सॉक्स, बनियन्सचे तुकडे एकदा वापरून टाकून देता येतील, असे वापरता येतात. स्वयंपाकघरात अंतर्वस्त्र वापरण्यापेक्षा हे नक्कीच बरे. अनेक घरांमध्ये केवळ ज्येष्ठ नागरिक राहत असतात. हात-पाय चालावे म्हणून थोडीफार कामे करतात दिवसभर. त्यांना अशी छोट्या कपड्यांच्या तुकड्यांची सोय फारच कामास येते. धुऊन वापरायचे काम वाचते. एरवीही कुठे आणि किती धुळीचे ते काम आहे, त्यानुसार अशी छोट्या छोट्या कापडाची वर्णी लावता येते. चांगली फडकी दुस-या त्याहून ब-या साफसफाईला वापरता येतात. धुऊन परत परत वापरता येतात.

# मुलतानी मातीचे फेसपॅक प्रत्येकासाठी नाही,५ तोटे जाणून घ्या




जेव्हा त्वचेची काळजी घेण्याची गोष्ट येते मुलतानी मातीच्या फेस मास्काचा सल्ला दिला जातो.मुलतानी माती सौंदर्यासाठी खूप फायदेशीर आहे, तसेच ती आपली त्वचा निरोगी आणि सुंदर ठेवण्यास देखील उपयुक्त आहे. पण त्याचेही बरेच तोटे आहेत. वास्तविक, मुलतानी माती नैसर्गिक मातीचा एक प्रकार आहे. ही औषधी गुणधर्मांनी देखील समृद्ध आहे परंतु यामुळे आपल्या त्वचेला देखील काही नुकसान होऊ शकतं.

१ मुल्तानी मिट्टी हे संवेदनशील त्वचेसाठी फायदेशीर ठरण्यापेक्षा हानिकारक होऊ शकते.यामुळे त्वचेवर सौम्य पुरळ येऊ शकतात आणि त्वचा निर्जीव होऊ शकते. २ कोरडी त्वचा असणाऱ्यांनी चुकून देखील याचा वापर करू नये.या मुळे त्वचा अधिक कोरडी होऊ शकते. डोळ्याच्या भोवती लावल्याने त्वचेला कोरडेपणामुळे देखील नुकसान होऊ शकत. ३ मुलतानी मातीची प्रकृती थंड आहे.जर आपल्याला सर्दी-खोकल्याचा त्रास आहे तर आपण मुलतानी माती वापरू नये.या मुळे सर्दी-खोकला जास्त वाढू शकतो. ४ आपण नियमितपणे मुलतानी माती वापरत असाल तर वापरणे थांबवा,याचा जास्त वापर केल्याने चेहऱ्यावर सुरकुत्या येऊ शकतात. ५ मुलतानी मातीची सर्वात खास गोष्ट म्हणजे की ही तेलकट त्वचेसाठी खूप चांगली आहे.याचाअति प्रमाणात वापर केल्याने चेहऱ्यावर पुरळ देखील होऊ शकतात.काही गोष्टींची काळजी घेऊन आपण त्वचेला कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्यापासून वाचवू शकतो.

# मास्क वापरल्याने ऍलर्जी होत असल्यास हे सौंदर्य टिप्स अवलंबवा

आधी सूर्याच्या तीव्र प्रकाशामुळे चेहरा झाकला जात होता. आता कोरोना विषाणू पासून वाचण्यासाठी चेहरा झाकावा लागत आहे. सध्या कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे मास्क लावणे बंधनकारक झाले आहे. सध्या दोन मास्क लावावे लागत आहे. या मुळे चेहऱ्यावर अनेक समस्या उद्भवत आहे. कोरोना विषाणूच्या दरम्यान आपण वारंवार आपल्या तोंडाला हात लावू शकत नाही. चला तर मग जाणून घ्या की आपल्या




चेहऱ्याची काळजी कशी घेता येईल.

१ मेकअप करू नका- आपल्याला हे माहित आहे की मास्क लावायचे आहे तर कोणत्या ही प्रकारचा मेकअप करू नका. या मुळे आपल्याला खाज येण्याची समस्या उद्भवू शकते. मेकअप केल्याने चेहऱ्यावरील ऑक्सिजनचा संचार कमी होतो. या मुळे चेहऱ्यावर पुरळ,मुरूम होण्याचा धोका वाढतो.

२ मास्क लावू नका- आपण एकटे असाल तर मास्क लावू नका. बाहेरून आल्यावर चेहरा फेसवॉश ने स्वच्छ धुवून घ्या आणि मॉइश्चराइजिंग सौम्य क्रीम लावून घ्या. या मुळे चेहऱ्याचा ओलावा टिकून राहील.

३ टूथपेस्ट लावा- जर आपल्याला चेहऱ्यावर मास्क लावल्याने मुरूम येतं आहे तर रात्री झोपण्यापूर्वी टूथपेस्ट लावा असं आपण १ आठवड्या पर्यंत करा. हळू-हळू आराम मिळेल.

४ नारळाचं तेल - शरीरावर रॅश आल्यावर नारळाचं तेल लावतात.कारण त्याची प्रकृती थंड असते. जर आपल्याला ही चेहऱ्यावर खाज येतं असेल किंवा रॅश आले असतील तर नारळाचं तेल लावू शकता. या मुळे काही नुकसान होणार नाही.

५ वाफ घ्या- चेहऱ्यात योग्य प्रमाणात ऑक्सिजन चा पुरवठा होत नसेल तर एक्ने किंवा मुरुमांचा त्रास होतो.या साठी आपण चेहऱ्यावर कोरफड जेल लावून गरम पाण्याची वाफ घेऊ शकता. या मुळे चेहऱ्यावर ओलावा टिकून राहील, चमक येईल आणि मुरूम देखील कमी होतील.

## विशेष वृत्त

### नारायण विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**बीड :** तालुक्यातील आहेर चिंचोली येथील श्री नारायण विद्यालयाचा दहावी बोर्ड परीक्षेत निकालाची परंपरा कायम ठेवलेली आहे. विद्यालयातील एकूण नियमित ९४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, पैकी विशेष प्राविण्यासह ३९ आणि फर्स्ट डिव्हिजन मध्ये ३४ अशाप्रकारे शाळेचा निकाल ९१.४८ टक्के लागलेला आहे. प्रथम क्रमांक निर्मळ शिवानी संदिपान ९३.६०, दुसरा क्रमांक काळे श्रावणी बाळू ९२.२० आणि तृतीय क्रमांक काळे प्रतीक्षा तुकाराम ९१.९० आलेला आहे. संस्थेचे अध्यक्ष माननीय महादेवराव काळे, प्राचार्य तथा मुख्याध्यापक अमोल काळे यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलेले आहे. वर्गशिक्षक शेख अश्फाक अहमद तसेच करपे एस.ए. यांनी विशेष मेहनत घेतली. शाळेचे इतर शिक्षक रकटे बी. आर, रकटे एन. पी, चव्हाण वाय.डी, इनकर बी.जे, चौधरी पी. बी, पवार पी.एल यांचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभलेले आहे. परिसरातील ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### समर्थ विद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम

**बीड :** गेवराई तालुक्यातील शिरसमार्ग येथील समर्थ विद्यालयाने इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला आहे. ६१ विद्यार्थी परीक्षेस बसले होते त्यापैकी ३५ विद्यार्थी विशेष श्रेणीत, १५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व १० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होऊन शाळेची परंपरा कायम ठेवली आहे. शाळेतून प्रथम क्रमांकाने अंजली ठोंबरे ८७.८० टक्के, द्वितीय ऋषिकेश जाधव ८७.४० टक्के, तर तृतीय संध्या पवळ ८५.४० टक्के गुण मिळवुन यश संपादन केले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव तथा शाळेचे मुख्याध्यापक सुभाषराव पवळ, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### दहावी परीक्षेत चंपावती विद्यालयाचा ९९.३० टक्के निकाल

**बीड :** दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून चंपावती माध्यमिक प्रशालेचा ९९.३० टक्के निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. व निकालाच्या उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. प्रशालेतून २८७ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यापैकी २८४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन प्रशालेचा ९९.३० टक्के इतका निकाल लागला आहे.

शाळेमधून गुणानुक्रमे प्रथम खडके हर्षित रमेश १०० टक्के, शेळके आदर्श मच्छिंद्र १०० टक्के, द्वितीय शेळके अमित मच्छिंद्र ९९.८० टक्के, तृतीय नागापुरकर सार्थक प्रशांत ९८.६० टक्के, चतुर्थ बोडखे भाग्यश्री बाळू ९८.४० टक्के, काकडे श्रुती विजय ९८.४० टक्के, कुलकर्णी नंदन जानकीराम ९८.४० टक्के, सुपेकर प्रसाद संकेत ९८.४० टक्के, पाचवा कुलकर्णी श्रेया रवींद्र ९८. २० टक्के, राऊत नरेंद्र आनंद ९८.०० टक्के, पवार वेदिका दत्ता ९७.८० टक्के, आठवा कुलकर्णी गिरीश गजानन ९७.६०, गव्हाणे श्रुती श्रीकृष्ण ९७.२०, मुळे सृष्टी शशिकांत ९७, रकटे यश प्रदीप ९७. या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन चंपावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. कालिदासराव थिगळे, सभापती विलासराव बडगे, उपसभापती ॲड. मधुसूदन बाहेगव्हाणकर, कार्यवाह प्रा. जगदीशराव काळे, उप. कार्यवाह ॲड. गोविंद कासट, कोषाध्यक्ष डॉ. दिलीपराव देशमुख, संचालक शरदराव रायते, डॉ. साहेबराव भोपळे, ॲड. नारायणराव लोणकर, ॲड. विश्वंभरराव थिगळे, जवाहरलाल सारडा, तसेच शाळेच्या प्राचार्या तथा मुख्याध्यापिका एन.डी. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक तथा उपप्राचार्य एस.ए. चौसाळकर, पर्यवेक्षक जी.डी. सोमाणी, कॉलेजचे इन्चार्ज चौडे, शिक्षक प्रतिनिधी एम.पी. महाजन सर, श्री. खडके, शिक्षकेत्तर कर्मचारी जाजू, संजय कुलकर्णी, प्रशालेचे सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन व कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### वसंतदादा पाटील महाविद्यालयातर्फे वन्य पशु-पक्ष्यांना चारा वितरण

**पाटोदा :** येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील 'चंपारण्य ग्रीन क्लब' व प्राणिशास्त्र विभागामार्फत १२ मे रोजी वन्यजीव प्रगणना दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील नायगाव मयूर अभयारण्यात वन्य पशु-पक्ष्यांसाठी चारा वितरण करण्यात आला. प्राचार्य आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली हा अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य आबासाहेब हांगे, चंपारण्य ग्रीन क्लबचे समन्वयक प्रो. महादेव काळे यांच्यासह सर्पराज्ञी संस्थेचे सर्पमित्र सिद्धार्थ सोनवणे, वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल सांगुळे, वनपाल बी. एम. बागवान, वनरक्षक बद्रीनाथ परजने, मिसाळ, माने, शेळके व इतर कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयातर्फे ५५ किग्रॅ तांदूळ, १० किग्रॅ व ५ किग्रॅ गहू वन्य अभयारण्यातील वन्य पशु-पक्ष्यांसाठी चारा म्हणून उपलब्ध करून देण्यात आला.

# पहिल्याच अवकाळी पावसामुळे तुडुंब भरून लोकांच्या घरात व हॉटेलमध्ये घुसले पाणी

## अंधारे मॅडम उघडा डोळ्याने बघा नीट ; भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील





**बीड (प्रतिनिधी):-** सोमवारी दुपारी साडेतीन व चारच्या दरम्यान अचानक वाऱ्यासह वादळासह बीड शहरामध्ये अचानक अवकाळी पाऊस आल्यामुळे बीड शहरातील दळणवळण विस्कळीत झाले व पडलेल्या पावसाचे पाणी येथे असलेल्या नाल्या आणि नाला यामध्ये घाण साचल्यामुळे पाणी जाणार कुठे तर लोकांच्या घरात आणि लोकांच्या हॉटेलमध्ये घुसले तसेच बार्शी रोडवरील जय महाराष्ट्र हॉटेलमध्ये तर या नाला व नालीच्या घाण पाण्याचा खूप मोठा ढवच साचला होता याचे हे चित्र ही सोमवारी बीड शहरातील नागरिकांनी प्रत्यक्षात पाहिले आहे यामुळे अनेक व्यापाऱ्यांना नागरिकांना या घाण पाण्याचा त्रास सहन करावा लागला हा त्रास आता कुठपर्यंत सहन करायचा अशी चर्चा देखील बीड शहरातील नागरिक तमाम बीड शहरवासीय नागरिक करत आहेत अजून तर पावसाळा ही सुरू झाला नाही हा अवकाळी पाऊस आहे या अवकाळी पावसात जर अशा नाली आणि नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर बीड नगरपालिकेचा आदर्श काय घ्यायचा हा ही प्रश्न बीड शहरातील तमाम नागरिकांना पडला आहे स्वच्छते कडून सुंदर ते कडे जाण्याचा हाच मार्ग आहे का हे एकदा बीडच्या नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी स्वतःचे आत्मपरीक्षण करून पहावे आणि बीड करांना या घाणीच्या साम्राज्यापासून व या नाला आणि नाल्या मध्ये साचलेल्या कचरा नगर प्रशासनाच्या माध्यमातून कचरा स्वच्छ व साप नाल्या नाला करून या होणाऱ्या त्रासातून सुटका करावी आणि नगर प्रशासनाच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांच्या बीड शहरातील सर्व नाली आणि नाला हे साफ करून घेण्यात यावे जेणेकरून भविष्यामध्ये लवकरच पाऊस जवळ येत आहे चार महिने पावसाचे कसे जायचे अशा जर नाल्या व नाला भरून लोकांच्या घरात पाणी जात असेल तर लोकांचे घरच वाहून जायला हॉटेल वाहून जायला वेळ देखील लागणार नाही असे सुसाट वेगाने पाणी लोकांच्या घरात शिरत आहे हा आज अंदाज बिडकर यांना आलेला आहे म्हणून बीड नगरपालिकेच्या सीईओ नीता अंधारे मॅडम यांनी तात्काळ या महत्त्वाच्या बाबीकडे लक्ष देऊन बीड शहरातील स्वच्छता आणि सुंदरता याकडे आपला भर देऊन बीड शहरातील लोकांचे आरोग्य कसे उत्तम ठेवता येईल याकडे लक्ष द्यावे असे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात भारतीय जनता पार्टी नेते तथा बीड नगरपालिकेचे माजी सभापती या नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे.नसता बिलकरांना रस्त्यावर उतरावे लागेल आणि आम्ही त्यांच्या सदैव सोबत ठामपणे उभा राहू असा विश्वास ही भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील नागरिकांना दिला आहे म्हणून आता या कडे नगर प्रशासन कोणत्या दृष्टीने पाहते आणि बिडकर यांना या घाणीच्या साम्राज्यातून सुटका करून व नाली वनाला साफ करून न्याय मिळवून देते का हे देखील पाहणे गरजेचे असणार आहे.

## बालग्रामची खडतर परिस्थितीवर मात; दहावीच्या विद्यार्थ्यांचे यश

**गेवराई (प्रतिनिधी):-** येथील सहारा अनाथालय तथा बालग्राम परिवारातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या आव्हानांना तोंड देत इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांसह बालग्राम परिवाराचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सहारा अनाथालयातील एकूण १५ विद्यार्थ्यांनी यंदा इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती. पैकी डोळ्यांच्या आजाराने त्रस्त असलेला नारायण वगळता सर्वच विद्यार्थी भरघोस गुणांनी उत्तीर्ण झाले. काहीजणांनी विशेष प्राविण्यासह गुण प्राप्त केले आहेत. इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत अनाथालयातील विद्यार्थ्यांसमोर अनेक आव्हानं असतातच. त्यात मानसिक पातळीवरील खडतर आव्हानंही असतात. पण संतोष गर्जे व ॲड. प्रीती गर्जे यांची ऊब व धडपडीला प्रतिसाद देत दहावीच्या विद्यार्थ्यांनी सर्व आव्हानांवर मात केली. मंगळवारी लागलेल्या निकालात अक्षयने ८०.२०, हरीश ७५.२०, वैष्णवी ७४.४०, प्रतीक ७४.२०, पुष्कर ७४.२०, राखी ७३.६०, दिव्या ७२.६०, राम ७०.४०, संकेत ६७, अक्षरा ६६.६०, नामदेव ६३.८०, भगवान ६२.४०, गणेश ६० टक्के तर अभिषेकने ५३% इतके गुण प्राप्त केले आहेत. या विद्यार्थ्यांनी गेवराई शहरातील चिंतेश्वर विद्यालय व आश्रम शाळेत दहावीचे शिक्षण घेतले असून त्यांच्या यशासाठी शिक्षकवृंद, कर्मचारी व बालग्रामचे अधीक्षक संदीप नेहे, काळजीवाहक नंदा पवार, सुवर्णा, अर्जुन, धम्मपाल, बाळासाहेब, गोपाल, नयन आदींनी परिश्रम घेतले. या यशाबद्दल बालग्रामचा मित्र परिवार व शुभचिंतकांकडून यशस्वी विद्यार्थ्यांसह संपूर्ण बालग्राम परिवाराचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### विद्यार्थ्यांच्या यशाने कामाला हुरुप येतो - संतोष गर्जे

ज्यांच्या डोक्यावरील मायेचे छत्र हरवले आहे. त्यांना जमेल तितके प्रेम द्यावे, चांगले शिक्षण घेऊन त्यांनी स्वतःच्या पायावर उभे राहावे यासाठीच आमची सर्व धडपड असते आणि जेव्हा ही लेकरं आमच्या धडपडीला प्रतिसाद देत यशाला गवसणी घालतात तेव्हा काम करायला अजून अधिक हुरूप येतो अशी भावना बालग्राम परिवाराचे संतोष गर्जे व ॲड. प्रीती गर्जे यांनी व्यक्त केली. गर्जे दांपत्याने बालग्राम परिवाराच्या सर्व शुभचिंतकांचे आभारही मानले

## 'बॅकडेट' मध्ये शिक्षकभरती; प्रकरण दाबण्यासाठी शिक्षण विभाग सरसावला

### माहिती अधिकारात दिले अजब उत्तर

**बीड (प्रतिनिधी):-** शिक्षण विभागाने शासनाच्या आदेशाप्रमाणे पवित्र पोर्टलनूसार शिक्षकांची पदभरती करणे आवश्यक असताना शिक्षणाधिकाऱ्यांनी मागील तारखेत नियुक्त्या दाखवून पदभरती केल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांनी केली आहे. यानंतर मात्र, हे प्रकरण दाबण्यासाठी शिक्षणाधिकारी सरसावले असून 'भविष्य निर्वाह निधी व वेतन पथक' बीड कार्यालयाकडून तीन । वर्षाची माहिती मागविली होती. यानंतर जिल्हा परिषद जी शिक्षण अधिकाऱ्यांनी सदरील माहिती मिलीया हायस्कूलकडून घ्यावी, असे अजब उत्तर दिले आहे. बीड जिल्हा परिषदेत शिक्षणाधिकारी (प्राथ.) भगवान फुलारी व शिक्षणाधिकारी (माध्य.) नागनाथ शिंदे हे रूजू झाल्यापासून शिक्षण विभागामध्ये मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू आहेत. यामध्ये खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडून आर्थिक देवाण-घेवाण करून शिक्षक पदभरती करणे तसेच शिक्षकांना कायम मान्यता देणे अशा प्रकारची बेकायदेशीर कामे करून करोडो रूपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे, अशी सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांची तक्रार आहे. सादेक इनामदार यांनी तक्रार दिल्यानंतर शिक्षण विभागाकडे

माहिती आधिकार पाठवून त्यात वेतन अधिक्षक यांनी सन २०२२ ते २०२५ मध्ये सादर केलेले शालार्थ आयडीचे आदेश व थकित वेतन वितरीत केलेले आहेत, त्या वितरण आदेशाची प्रत मागविली होती. यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी सावध पावित्रा घेत तक्रारदाराची दिशाभूल करण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील एकूण माहिती न देता न मागविलेल्या मिलीया हायस्कूल धारूर या शाळेचे नाव टाकून प्रकरणाला बगल देण्याचा आणि दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. सदरील माहिती मिलीया हायस्कूलमधून घेण्याबाबत कळविले आहे. यामुळे जिल्ह्याची माहिती मिलीया हायस्कूलकडे दिली आहे काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## उपचार करावेत की नाही? दवाखान्याचे बिल न भरता डॉक्टरला धमकी

**बीड (प्रतिनिधी):** शहरातील श्रीनारायणी चाइल्ड के अर युनिटमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या बालकाच्या वडिलांनी ८३ हजार ६०० रुपयांचे बिल न भरता रुग्णालयातून बालकाला जबरदस्तीने घेऊन जात डॉक्टरला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी संबंधित डॉक्टरने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

डॉ. प्रदीप बबनराव शेळके यांनी तक्रारीमध्ये म्हटले आहे, एका ११ महिन्यांच्या बालकाला भाजल्याच्या गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याच्यावर सात दिवसांपासून पीआयसीयूमध्ये उपचार सुरू होते. उपचार पूर्ण झाल्यानंतर शनिवार दि.१० रोजी रात्री बालकाला डिस्चार्ज देण्याचे ठरवण्यात आले. त्यावेळी रुग्णाचे वडील रामेश्वर सुखदेव राठोड (रा. आंतरवणी पिंप्री तांडा, ता. बीड) यांना बिलाची माहिती देण्यात आली. मात्र, राठोड यांनी काही वेळाने डॉक्टर शेळके यांना फोन करून, शिवीगाळ करत, मी बिल भरत नाही, तुम्हाला काय करायचं ते करा, असे सांगून, हॉस्पिटलच्या बाहेर ये, तुला जिवे मारून टाकतो, अशी धमकी दिली. त्यानंतर रुग्णालयातील सुरक्षा व उपचार प्रक्रियेला धक्का देत, सलाइन काढण्याची प्रक्रिया पूर्ण न करता, बालकाला घेऊन हॉस्पिटलमधून निघून गेले. संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाईची मागणी डॉक्टर शेळके यांनी केली आहे. यामुळे डॉक्टरांनी उपचार करावेत की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## अंबाजोगाईत स्वारातीमध्ये परिचारिकांचा सत्कार

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तिर्थ रुग्णालयात जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सर्व परिचारिकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. परिचारिका रुग्णांच्या सुख दुःखात सहभागी होऊन, त्यांना आधार देणाऱ्या परिचारिका केवळ आरोग्यसेवा देत नाहीत तर रुग्णांमध्ये एक नवा विश्वास निर्माण करतात. याचाच एक सन्मान म्हणून व जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून आ. नमिता अक्षय मुंदडा, सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांच्या वतीने



बळीराम चोपणे, आनंत आरसुडे, मंदार काटे, सत्यप्रेम इंगळे, अजय राठोड यांनी सर्व परिचारिकांचा गुलाब पुष्प देऊन सन्मान केला. यावेळी रामानंद तीर्थ रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. धपाटे, डॉ. राकेश जाधव, डॉ. भोंडवे, डॉ. विडेकर यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## राज रायते यांचा भव्य राज्यस्तरीय सत्कार

**बीड (प्रतिनिधी):-** श्री संत गजानन नगरी शेगांव येथे होणाऱ्या भव्य राज्यस्तरीय सत्कार समारंभात बीड जिल्ह्यातील गायक राज प्रल्हाद रायते यांचा भव्य सत्कार करण्यात आला..या ठिकाणी राज रायते यांनी आपल्या सुमधुर आवाजात गीत सादर केले.. या ठिकाणी भरपूर समाज बांधव भारताच्या कानो कोपऱ्यातून आले होते. या गीताला इतका प्रतिसाद मिळाला की अक्षरशः कार्यक्रम झाल्यावर राज रायते सोबत फोटो काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी झाली.. राज रायते यांच्या ऑटोग्राफ तसेच नंबर घेण्यात आले.. राज रायते यांची चाहते लांब लांबून त्यांच्या भेटीसाठी खास कार्यक्रमात उपस्थित राहिले.. या कार्यक्रमात त्यांची फॅन फॉलोविंग कळत




आहे. आपल्या कलागुणांनी परिपूर्ण असलेल्या राज ला समस्त तेली समाज आज ओळखत आहे. या कार्यक्रमासाठी राज रायते यांचे कुटुंब आदी उपस्थित होते. तसेच मोठ मोठे मंत्रिमंडळ सुद्धा या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. राज रायते यांचा या कार्यक्रमात खूप जणांनी सत्कार सुद्धा केला आहे. आज संपूर्ण तेली समाजात राज रायते यांचे गीत गाजत आहे. व सर्व सोशल मीडियात राज रायते यांच्या गीताला लाखोच्या वर लोकांनी पाहिले आहे.. आज सर्व कडे राज रायते यांच्यावर अभिनंदन चा वर्षाव होत आहे.. बीड जिल्ह्यातील असलेला राज रायते आज त्याला समस्त समाज ओळखत असून.. त्यांचे जागोजागी गायनाचे कार्यक्रम ठेवण्यात येत आहे. राज रायते यांचा संपर्क क्रमांकः ८९९९२६२३६७.

## कर्तव्यदक्षतेशिवाय जीवन सार्थकी होऊ शकत नाही : विश्वंभर गोल्डे

**बीड (प्रतिनिधी):-** कठोर परिश्रम आणि संस्काराशिवाय मनुष्य जीवन सार्थकी होत नाही, असे मत बीडचे उपविभागीय पोलिस उपविभागीय अधिकारी विश्वंभर गोल्डे यांनी व्यक्त केले. महामार्ग पोलीस केंद्र मांजरसुंबा येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक रवींद्र किसनराव नागरगोजे यांचा सेवानिवृत्ती सोहळा दि. १० मे २०२५ रोजी बीड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. नागरगोजे यांनी ३० एप्रिल २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती घेतली. कार्यक्रमात बोलताना डीवायएसपी गोल्डे म्हणाले, कर्तव्यदक्षतेने आणि प्रामाणिकपणे सेवा बजावल्यास जीवन अधिक अर्थपूर्ण होते. नागरगोजे यांनी ही सेवा करताना अनेक अडचणींवर मात केली, म्हणूनच आज त्यांचा गौरव करण्यासाठी एवढी मोठी उपस्थिती आहे. यावेळी काही विनोदी आठवणींनी उपस्थितांमध्ये हास्याची लाट उसळली. कार्यक्रमात वाहतूक शाखेचे पो.उ. विजय जाधवर, डॉ. संजय तांदळे (मातृभूमी प्रतिष्ठान अध्यक्ष) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नागरगोजे यांचे सुपुत्र सुरज नागरगोजे (जलसंपदा विभाग, संगमनेर) व निखिल नागरगोजे (केईएम हॉस्पिटल, मुंबई) यांनी आपल्या मनोगतातून वडिलांप्रती भावना व्यक्त करत उपस्थितांना भावविवश केले. कार्यक्रमात त्यांच्या कन्या स्मिता नागरगोजे (पुणे), जावई श्रीकांत आव्हाड (कक्ष अधिकारी, मंत्रालय) तसेच बंधू मदन नागरगोजे (सहाय्यक फौजदार, औरंगाबाद ग्रामीण) यांचीही उपस्थिती होती. प्रारंभी सपत्नीक नागरगोजे यांचा त्यांच्या आईवडिलांनी पुष्पहार घालून सत्कार केला. त्यानंतर मातृभूमी प्रतिष्ठान आणि मित्रपरिवार यांच्या वतीने शाल, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन भिवराज कोकणे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मदन नागरगोजे यांनी मानले. चराठा गावासह बीड शहरातील नातेवाईक, मित्रमंडळी, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्या होणार समुपदेशनाने

## ना.पंकजाताई मुंडेंचा ऐतिहासिक निर्णय



मुंबई (सरकार): मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा व बदल्यांची प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडावी यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त या संवर्गातील बदल्या समुपदेशनाने करण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतला आहे.

समुपदेशनाने बदल्यांची कार्यवाही दि. १५ व १६ मे २०२५ रोजी आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे येथे आयोजित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेदरम्यान सुमारे ६५० अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येणार आहेत.पशुसंवर्धन विभाग व दुग्धव्यवसाय विभागाची पुनर्रचना केल्यानंतर काही नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यामुळे एकत्रित पशुसंवर्धन विभागांतर्गत रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे तीन हजार पेक्षा जास्त पदांचे मागणीपत्र सादर करण्यात आले असून नजिकच्या काळात सदर पदे भरली जाणे अभिप्रेत आहे.

पशुसंवर्धन विभागातील मोठ्या प्रमाणात असलेली रिक्त पदे व बदली पात्र कर्मचाऱ्यांची मर्यादित संख्या यामुळे राज्याच्या सर्व भागात मनुष्यबळाचा समतोल साधला जावा, यासाठी पशुधन विकास अधिकारी व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातील प्राधान्याने भरावयाची पदे निश्चित करण्यात आली आहेत. या पदांवर बदलीने पदस्थापना करण्यासाठी बदलीपात्र अधिकाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली देण्यासाठी समुपदेशनाची कार्यपध्दती अवलंबण्यात येणार आहे. त्याव्दारे बदलीपात्र अधिकाऱ्यांना प्राधान्यक्रम व जेष्ठतेनुसार उपलब्ध पदांमधून त्यांच्या पसंतीचे ठिकाण निवडण्याची संधी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली आहे.

समुपदेशनाने बदलीची कार्यपध्दती पार पाडताना ती पारदर्शकपणे पार पाडली जाईल, याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या असून यामध्ये बदलीसाठी निर्धारित करण्यात आलेली पदे, दिव्यांग, गंभीर आजार असलेले कर्मचारी, असक्षम पाल्य, विधवा किंवा परित्यक्ता असलेल्या महिला, पती-पत्नी एकत्रिकरण अशी वर्गवारी करण्यात आली आहे. बदलीपात्र अधिकाऱ्यांची वर्गवारीनिहाय जेष्ठता यादी व बदलीसाठी उपलब्ध पदे यांची यादी विभागाच्या पशुसंवर्धन संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याची लिंक सर्व संबंधित अधिकाऱ्यांनाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर वर्गवारीतील जेष्ठ अधिकाऱ्यांस बदलीचे ठिकाण निवडण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

# आ.संदीप क्षीरसागर यांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक



बीड (सरकार): शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि. १३) रोजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत शहरातील नालेसफाई, रस्त्यांची स्वच्छता, आणि पाण्याचा निचरा यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. आ. क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना मान्सूनापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यासाठी नियोजन करण्याचे निर्देश दिले. बीडकरांना पावसाळ्यातील समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे,असे आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी सांगितले. येत्या १० ते १२ दिवसांमध्ये शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम पूर्ण करण्याचे नियोजन करून स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर राबविण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेला दिले आहेत.

## लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय खापर पांगरी विद्यालयाचा 100% निकाल

बीड (सरकार): ६२ विद्यार्थी विशेष प्राविण्य ८ विद्यार्थी प्रथम श्रेणी तर ०१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत . १९ विद्यार्थी ९० % पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले.गुणानुक्रमे विद्यार्थी १.कथले कार्तिक युवराज ९६.४०% २ .कथले सौरभ गणेश ९६ % ३.शेख सरीना मजित ९६ % ४ .गायके पायल विष्णु ९४.२० % ५ . कथले ऋतुजा विठ्ठल ९४ .२०% ६ . चव्हाण सानिका गोरखनाथ ९३.४०% ७ . शिंदे ऋतुजा शिध्देश्वर ९३.२० % ८ आगाम साक्षी ज्ञानेश्वर ९३ .२०% ९ . गवते संध्या भाऊसाहेब ९३.२०% १०. बजगुडे साक्षी वैजिनाथ ९२ .४०% ११. चौरे चैतन्य कल्याण ९२.२०% १२. शेळके तेजस्विनी दादासाहेब ९२.८०% १३ . पवार चरण रायचंद ९२.४०% १४ . हाकाळे ओंकार सुग्रीव ९१% १५ . गायके संग्राम रामप्रसाद ९०.८०% १६ . भोसले प्रतिक्षा संजय ९०.८०% १७ . चव्हाण ऋतुजा राहूल ९०.८०% १८ . घोलप सिद्दि नारायण ९० .६०% १९ . आगाम पायल अच्यूत ९०.६० % या यशाबद्दल संस्था अध्यक्ष श्री राजेंद्रजी आगवान, उपाध्यक्ष श्री पंजाबराव मस्के ,सचिव सतीश पत्की, सहसचिव विनय आगवान, शालेय समिती अध्यक्ष श्री संजय पत्की, मुअ घोडके डी डी, शिक्षक वशिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्त यांनी उत्तीर्ण विद्याथर्यां चे अभिनंदन करून व पुढील वाटचालिस शुभेच्छा दिल्या.

# सौ.के.एस.के. महाविद्यालयात छत्रपती संभाजीराजे यांची जयंती साजरी




बीड (सरकार): सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात १४ मे रोजी छत्रपती संभाजी राजे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रास्ताविकात बोलताना म्हणाले की, वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी स्वराज्याचे युवराज तर तेवीसाव्या वर्षी स्वराज्याचे छत्रपती झाले.केवळ चौदाव्या व पंधराव्या वर्षी छत्रपती संभाजी राजांनी साहित्य,कविता यांच्यात रस घेतला आणि याच काळात छत्रपती संभाजी महाराज संस्कृत पंडित झाले. बुधभूषणम या संस्कृत ग्रंथासह इतर भाषेतले तीन ग्रंथही छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहिले. शौर्य, धीरोदत्तपणा, क्षात्रतेज,निर्भिडता,प्रखर बुद्धिमत्ता अशा एक ना अनेक गुणांचा समुच्चय करणारे हे व्यक्तिमत्व राजकारण,समाजकारणाबरोबरच जगण्याचे आणि नातेसंबंधातील गुंतागुंतीचे अनेक पापुद्रे उलगडून दाखवते. म्हणूनच त्यांचे स्मरण आपल्याला विचार करण्यास भाग पाडते. अश्या स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करतो असे विचार व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे,डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,प्रा.जालिंदर कोळेकर,ग्रंथपाल पटाईत, प्रा.बोबडे सर यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# बीडच्या नॅशनल उर्दू माध्यमिक शाळेचा दहावी बोर्डाचा निकाल ९१.७८टक्के



बीड (सरकार): शहरातील जुना बाजार भागात असलेल्या नॅशनल उर्दू माध्यमिक शाळेत इयत्ता दहावी बोर्डाचा निकाल ९१.७८ टक्के असा घवघवीत लागला आहे.


दिनांक १३ मे २०२५ रोजी जाहिर करण्यात आलेल्या दहावी बोर्ड परिक्षेत नॅशनल उर्दू माध्यमिक विद्यालयाचे ७३ विद्यार्थी बसले होते. यापैकी ६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यात ६विद्यार्थी विशेष प्राविण्याने, १९प्रथम श्रेणीत, ३९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण व ३विद्यार्थी तृतीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. या पैकी शेख मुसेरा हरम मुहम्मद फेरोज हिने ८७.६०% गुण घेत शाळेत प्रथम क्रमांक मिळविला. नायेरा रफिक पठाण हिने ७८.६०% गुण घेत शाळेत द्वितीय क्रमांक मिळविला. शेख जुनेरा फातेमा मुहम्मद युनूस हिने ७७.८०% गुण घेत तृतीय क्रमांक मिळविला. या सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार ड. सिराजोद्दीन देशमुख, संस्थेचे सचिव सुभाषचंद्रजी सारडा आणि मुख्याध्यापक सिद्दीकी नवीद यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

## विशाखा सूर्यवंशीचे दहावीत घवघवीत यश



बीड (सरकार): कु विशाखा राजाभाऊ सूर्यवंशी हिचे दहावी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून तिने ९५.२०/ टक्के घेऊन उत्तीर्ण झाली आहे तिच्या या यशामुळे सर्व स्तरातून तिचे कौतूक व अभिनंदन केले जात आहे

# मराठवाडास्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धेमध्ये बीडचा देव मुळे प्रथम,स्वराली साळुंके द्वितीय




बीड (सरकार): गेवराई येथील स्वरसिद्धी फाउंडेशनच्यावतीने आयोजित मराठवाडा स्तरीय शास्त्रीय गायन स्पर्धा (छोटा ख्याल) यामध्ये बीडच्या देव दीपक मुळे याने प्रथम क्रमांक पटकावला, तर स्वराली नामदेव साळुंके हिने द्वितीय क्रमांक मिळवला. मराठवाड्यातील विविध भागांतील स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

देव मुळे याने 'अमृतवर्षणी' रागामधील दृत एकताल बंदिश सादर करत श्रोत्यांची मने जिंकली. स्वराली साळुंके हिने 'राग दुर्गा' मधील तीनताल बंदिश सादर करत तिच्या गायकीने उपस्थितांचे मन जिंकले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. तुळशीराम आतकरे व निशिगंधा डावरे (अहिल्यानगर) यांनी केले. गेवराईसारख्या लहान शहरात शास्त्रीय संगीताच्या प्रचारासाठी स्पर्धा घेणे आणि त्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळवून देणे, ही अभिनंदनास्पद बाब आहे. या उपक्रमाबद्दल स्वरसिद्धी फाउंडेशनच्या अध्यक्षा कु. सिद्धेश्वरी कोकाटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. देव व स्वराली यांच्या यशाबद्दल पं. गिरीश जोशी, प्राचार्य डॉ. सौ. दीपा क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे, सैनिकी विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन पवार, शिक्षक मिलिंद शिवनीकर, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत सुलाखे, रसिक फाउंडेशनचे अध्यक्ष अमरजी डागा, दीपक मुळे (देव कोचिंग क्लासेस), तबलावादक नरहरी धुळे, ह.भ.प. डाके महाराज, तसेच स्वरांग संगीत विद्यालयाचे संचालक व मार्गदर्शक नामदेव साळुंके यांनी अभिनंदन केले आहे.

## अभिषेक दुधाळचे दहावीच्या परीक्षेत यश

बीड (सरकार): येथील वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय दुधाळ यांचा मुलगा चि.अभिषेक दुधाळ या विद्यार्थ्याने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९५.६०% गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चि.दुधाळ अभिषेक दत्तात्रय या विद्यार्थ्याला मराठी विषयात ८९, हिंदी ९३ इंग्रजी ९१, गणित ९६, विज्ञान ९८ तर सामाजिक शास्त्रात १०० पैकी १०० गुण मिळवून एकूण ५०० पैकी ४७८ गुण मिळवून घवघवीत यश मिळविले आहे.

## पुर्वा लड्डा हिचे दहावी बोर्ड परीक्षेत यश



बीड (सरकार): येथील नामांकित शिक्षण संस्था, राजस्थानी सेवा समाज, बीड द्वारा संचलित, द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय बीडची इयत्ता दहावीची विद्यार्थीनी कु. पुर्वा संजय लड्डा हिने घवघवीत यश संपादन केले आहे.

दहावीच्या परिक्षेत कु. पुर्वा संजय लड्डा हिने ९३.६० गुण मिळविले असून शाळेतून सातवा क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल मुकूंदलाल लड्डा, जुगलकिशोर लड्डा, अशोककुमार मणियार जालना, जगदीशप्रसाद लखोटीया मंठा, राहुल जाजु कळंब, रामनिवास काबरा हिंगोली, द्वारकादास लड्डा, गोपाल लड्डा, गोविंद लड्डा, संजय लड्डा,पवन लड्डा, ओमप्रकाश सिकची, राजेश कासट, विशाल भराडीया, संकेत भुतडा, डॉ. श्रीनिवास भुतडा, संताष लड्डा, शिक्षक सोहनीसर यांच्यासह शिक्षकवृंदांनी कु. पुर्वाचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या यशबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा ९४% निकाल



वडवणी (सरकार): तालुक्यातील चिंचाळा येथील अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा दहावीचा निकाल ९४ टक्के लागला असून यावर्षी मुलींनी निकालात बाजी मारली आहे .

अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकालामध्ये प्रथम गायकवाड धनश्री सचिन ९१.२०%, द्वितीय मुंडे पायल लक्ष्मण ९०% तर तृतीय आजबे वेदिका जगन्नाथ ८८. २०% तसेच ४० विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष सर्जेराव जी काळे सर व युवा नेते ॲड . आनंद काळे सर तसेच प्राचार्य तथा मुख्याध्यापक सावंत बी.आर सर यांच्यासह सर्व प्राध्यापक ,शिक्षक,शिक्षिका ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.


### महाराष्ट्र शासन

## कार्यकारी अभियंता मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४. छत्रपती संभाजीनगर

**पत्ता- कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४. छत्रपती संभाजीनगर**

**ई-मेल :-** eeunit4gmail.com **दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४६०२**

## निविदा सुचना क्र. ०६ सन २०२५-२६

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४. छत्रपती संभाजीनगर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सुचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे .

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याच्या अधिकार कार्यकारी अभियंता, मुख्य व्दार उभारणी पथक क्र. ४, छत्रपती संभाजीनगर जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध् करुन देण्यात येईल.

कामाचे नाव :-

१. पैठण उजवा कालवा किमी ११.६६, खामपिंपरी ता. शेंगाव जि. अहिल्यानगर वरील काटनियामक वक्रं व्दारे (Cross regulatory radial gate) (आकार ५.५ x ४.५ मी.- ०३ नग) च्या दुरूस्ती कामबाबत....

निविदेची किंमत रुपये :- **१. रू. ७,७४,४९९/-**

२. पैठण उजवा कालवा किमी २३, कांबी ता. शेंगाव जि. अहिल्यानगर वरील काटनियामक वक्रं व्दारे (Cross regulatory radial gate) (आकार ५.५ x ४.५ मी. -०३ नग) च्या दुरूस्ती कामबाबत....

निविदेची किंमत रुपये :- **१. रू.७,९८,४७४/-**

**जिल्हा :- बीड..**

निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १३/०५/२०२५ ते दिनांक २०/०५/२०२५.

निविदा उघडण्याचा दिनांक - २३/०५/२०२५.

जा.क्र. मु.व्दा. उ.प.क्रं. ४ छ.सं.न./तांशा-२/नि.सु.क्र.०६ सन २०२५-२६/६९८/सन २०२५

स्वाक्षरित/

**कार्यकारी अभियंता**

मुख्य व्दार उभारणी पथक क्र.४,

छत्रपती संभाजीनगर.

**जिमाका/बीड/जाहि/२०२५-२६/२०**


हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९

(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779

(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)